**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अशोक सुरेश मोरे
मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती शिरुर,
ता.शिरुर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
पाबळ ग्रामपंचायत पाबळ,
ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५१/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/११/२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १/१२/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/१२/२००८ |
| ६ | **उपस्थिती**<br>जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>पाबळ ग्रामपंचायत पाबळ, ता.शिरुर, जि.पुणे<br>श्री.जी.एस.काळे | |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पाबळ ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी मिळकत कर भरला असल्याबाबतच्या पावत्या, त्यांच्याकडे थकीत असणारा कर वसूल न करण्याची कारणे, ग्रामसेवक मुख्यालयाच्या ठिकाणी निवासी असतात का, नसल्यास त्याची कारणे ग्रामपंचायतीअंतर्गत येणा-या पाणीपुरवठा योजनेसंदर्भातील माहिती, ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येणा-या कामांची व त्यासाठीच्या ठरावांची माहिती तद्नुषंगीक एकूण ६ मुद्दे | |

## विवेचन

'ग्रामसेवक, ग्रामपंचायत पाबळ यांच्याकडे मागितलेली माहिती मला मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री. अशोक सुरेश मोरे यांनी दि.९/०४/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 9 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संदिप विलास पाटील ..... **अपीलकर्ता**

मु.पो.भूये, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वाचक पोलीस उपअधीक्षक, विशेष पोलीस ..... **उत्तरवादी**

महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस

महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९ /२०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ७.४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदिप विलास पाटील
मु.पो.भूये, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** वाचक पोलीस उपअधीक्षक, विशेष पोलीस
महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.एम.जी.सावंत

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी तथा** कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.आर.आर.जाधव | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १४.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक ८.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक १९.१२.२००९ |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत व आपल्याला मिळालेल्या धमकीबाबत आपण केलेल्या तक्रार अर्जावर पोलिसांनी योग्य प्रकारे चौकशी केली नाही. हवालदाराने आपल्या विरूध्दच गुन्हा नोंदविला व चौकशी कामी आपण हजर राहिलो नसल्याचा खोटा अहवाल वरिष्ठांना सादर केला. चौकशी कामी आपण हजर असतानाही चौकशी न करता आपले अपील वरिष्ठ अधिका-यांनी निकाली काढले. आपण हजर राहत असताना हजर नसल्याचा खोटा अहवाल सादर करून खोटी माहिती दिल्याबद्दल संबंधितांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संदिप विलास पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांचा मूळ तक्रार अर्ज संबंधित कार्यालयाकडे वर्ग केला होता व त्याना माहिती देण्याबाबत दिलेल्या सूचनांची प्रत अपीलकर्त्यास दिली. अपीलकर्ता चौकशीसाठी हजर राहत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, कोल्हापूर यांनी कळविले. तो प्रशासकीय कार्यवाहीतील भाग आहे. माहितीशी संबंधित बाबींची पूर्तता करण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस माहनिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री.आर.आर.जाधव यांनी केले. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडील चौकशी अहवाल दि.११.१२.२००९ च्या पत्रान्वये आपल्या कार्यालयाला

प्राप्त झाला त्याची प्रतही अपीलकर्त्यास पुरविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस माहनिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री.आर.आर.जाधव यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली माहितीच्या अधिकारातील कार्यवाही योग्य आहे. मूळ प्रकरणात अपीलकर्त्याच्या उपस्थितीबाबत संबंधित हवालदारांनी केलेली नोंद खरी की खोटी, याबाबत पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तुकाराम पांडुरंग भोसले
मु. पवईमाळ, पो. पणदरे, ता.बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
माळेगाव बु., ता. बारामती, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी, पवईमाळ,
पो. पणदरे, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.२.२०१०. |

६ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. तुकाराम पांडुरंग भोसले
मु. पवईमाळ, पो. पणदरे, ता.बारामती, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी,
माळेगाव बु., ता. बारामती, जि. पुणे श्री. एन. डी. काळे

**जन माहिती अधिकारी** तथा तलाठी, पवईमाळ,
पो. पणदरे, ता. बारामती, जि. पुणे श्री. यु. एम. कदम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा तलाठी, पवईमाळ, ता. बारामती यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, माळेगांव बु. यांनीही त्यांना पाठीशी घातले. माहिती देण्याची टाळाटाळ केली, यामुळे आपले नुकसान झाले. त्याला जबाबदार असणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. तुकाराम पांडुरंग भोसले यांनी केली.

संबंधित अभिलेख आपल्या कार्यालयात उपलब्ध नसून तहसील कार्यालयात जमा केले असल्याचे मुद्देनिहाय उत्तर अपीलकर्त्यास दिले. काही मुद्दयांबाबत त्यांनी खुलासेवजा विचारणा केली होती, त्याचेही उत्तर दिले. अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, माळेगांव बु. यांनी त्याचे स्पष्टीकरण दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, पवईमाळ, ता. बारामती श्री. यु. एम. कदम यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा तलाठी, पवईमाळ, ता. बारामती यांनी दिलेले उत्तर योग्य असले, तरी तहसील कार्यालयातून माहिती प्राप्त करुन घेऊन देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, माळेगांव बु. श्री. एन. डी. काळे यांनी केले. त्यानुसार अपीलकर्त्यास एका आठवडयात माहिती प्राप्त करुन द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे निवेदन अपीलकर्त्यांचे चिरंजीव श्री. अतुल तु. भोसले यांची पोहच [illegible] प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा तलाठी, पवईमाळ, ता. बारामती यांनी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजयकुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 20 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे
लोणी खुर्द, ता.राहाता,
जि.अहमदनगर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
एकात्मिक घटक, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१, भोर,
ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०१२/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/०४/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम उप-विभाग क्र.१,भोर,<br>ता.भोर, जि.पुणे यांचे प्रतिनिधी<br>श्री.ए. बी. हंडे, सहाय्यक जन माहिती अधिकारी<br>**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>एकात्मिक घटक, पुणे-१<br>श्री.अ. शं. खैरे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/११/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/०१/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सार्वजनिक बांधकाम भोर उप-विभागांतर्गत कार्यरत असलेले अभियंत्यांची नावे, त्यांचा कार्यकाल, त्यांनी केलेली कामे, कामांची संख्या, खर्चाचा तपशील व त्यांच्या वास्तव्याचे ठिकाण तदनुषंगिक एकूण १७ मुद्दे | |

## विवेचन

'मला सर्व माहिती समक्ष मिळाली असून माझे समाधान झाले आहे, माझी कसल्याही प्रकारची तक्रार नाही, असे अपीलकर्त्याचे दि.९/०६/२००९ रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग भोर, यांनी दिनांक २/०९/२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले तसेच सुनावणीच्यावेळी समक्ष सांगितले तथापि दि.२/०९/२००९ च्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी सही करताना त्यांचे नाव घातलेले नाही, याबाबत आयोगाशी पत्रव्यवहार करताना यापुढे दक्षता घेण्यात यावी, अशी समज जन माहिती अधिकारी तथा उप-विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप-विभाग क्र.१, भोर, यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठ्ठल आण्णा माळी
रा.५०१, खणभाग, माळी गल्ली,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/०४/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना,**<br>सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली<br>श्री.बबन निवृत्ती बनकर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०८/२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४/१२/२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/०९/२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०/११/२००९ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सांगली येथील सि.स.नं. १२५९७ ते १२६०१ मधील बांधकाम परवाना क्र.४८६/२००८ च्या मंजुरीसंदर्भातील कागदपत्रे | |

## विवेचन

'मी मागितलेली माहिती मला दरम्यानच्या काळात मिळालेली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्त्याचे दि. १५/०४/२०१० रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.बबन निवृत्ती बनकर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अशोक गोपाळ ओव्हाळ
स.नं.१३०, दांडेकर पुल,
जुनी देसाई वीट भट्टी,
पुणे-३०

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,**
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लिमिटेड,
शनिवार पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३०/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०१/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २/०१/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बँकेच्या सर्वसाधारण सभेची नोटीस, सभांच्या इतिवृत्तांची प्रत इ. | |

**विवेचन**

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेला असल्याने सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 APR 2010

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,** महाराष्ट्र राज्य, **पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या** कलम १९ (३) अन्वये **दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय सदाशिव औताडे
कार्यकारी संचालक,
श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.,
कागल, जि. कोल्हापूर
श्री. अशोक रामचंद्र बोरगांवे मूळ अर्जदार

अपीलकर्ता व
जन माहिती अधिकारी

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक
(साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि.,
कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६/ २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. डी. एस. साळुंखे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि., कागल, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. पी. व्ही. काकडे | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.९.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१२.२००९ |

| | |
|---|---|
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री. अशोक रामचंद्र बोरगावे यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची, आर्थिक स्वरुपाची असल्यामुळे नाकारली. दोन भावामधील वाद असून प्रकरण न्यायालयात दाखल आहे. त्रयस्थ पक्षाला विचारणा केली असता 'माहिती देऊ नये' असे त्यांनी लेखी दिले, परंतु माहिती देण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग यांनी दिले. आदेश अयोग्य असल्यामुळे रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अशोक रामचंद्र बोरगावे, कार्यकारी संचालकच यांनी केली. मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी या नात्याने या अपिलातील अपीलकर्ता श्री. अशोक रामचंद्र बोरगावे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब अपिलीय प्राधिकारी यांचा मूळ अर्जातील प्रथम अपिलाचा निर्णय अयोग्य ठरतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, यांनी मूळ प्रकरणी दि. १.१२.२००९ रोजी दिलेला निर्णय रद्दबातल ठरविण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. हन्नान अ. रहिमान खान
७, रेल्वे लाईन, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
नवीन प्रशासकीय इमारत, सोलापूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>नवीन प्रशासकीय इमारत, सोलापूर, जि. सोलापूर श्री. संभाजी चव्हाण | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.११.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१२.२००९ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. हन्नान अ. रहिमान खान( वय ८९ वर्षे)यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली असून रास्त भाव धान्य दुकानात नावाची नोंद होण्याची त्यांची मुख्य मागणी होती. 'माहिती मिळाली असून तक्रार राहिली नाही,' असे अपीलकर्त्यांतर्फे त्यांच्या चिरंजीवानी दि. १९.४.२०१० रोजी लेखी दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर श्री. संभाजी चव्हाण यांनी नमूद केले. उपरोक्त पत्राची प्रत त्यांनी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, खेड, ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक
शाळा, क्षित्राईमळा, चाकण, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण, ता.खेड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक
शाळा, क्षित्राईमळा, चाकण, ता.खेड, जि.पुणे श्रीमती व्ही.डी.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.९.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.१०.२००९ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अर्ज समक्ष देऊनही माहिती दिली नाही व आपण माहिती देण्यास सक्षम नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, क्षित्राईमळा, चाकण, ता.खेड, जि.पुणे यांनी दिले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यांनी केली.

मुख्याध्यापक हजर नसताना व आपण उपशिक्षक असताना अपीलकर्त्याने माहिती मागणीचे पत्र आपल्या वैयक्तिक नावे दिले. त्यामुळे माहिती देण्यास आपण तेव्हा सक्षम नव्हतो. जानेवारी अखेरीस मुख्याध्यापक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आता अपीलकर्त्यांनी मागितलेली सन १९९२ पासूनची माहिती सोबत आणली आहे, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, क्षित्राईमळा, चाकण, ता.खेड, जि.पुणे श्रीमती व्ही.डी.चव्हाण यांनी केले. जन माहिती अधिकारी नसलेल्या एखाद्या व्यक्तीच्या नावे अर्ज देऊन त्या व्यक्तीकडून माहिती मागण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. रीमती चव्हाण यांचे प्रतिपादन रासत आहे. सोबत आणलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, क्षित्राईमळा, चाकण, ता.खेड, जि.पुणे श्रीमती व्ही.डी.चव्हाण यांनी अपीलकर्त्यास देऊन त्याची पोहोच आयोगाला सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री.संभाजी भाऊसाहेब बुधावले
विक्रीकर कार्यालय, विक्रीकर भवन,
१७८, रविवार पेठ, सैनिक बँकेजवळ, पोवई नाका,
सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर विक्रीकर आयुक्त,
पुणे क्षेत्र, विक्रीकर भवन, पुणे ६

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त
पुणे क्षेत्र , विक्रीकर भवन, पुणे ६

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०७+४२१/ सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२२/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.६.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१३.८.२००७ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>अपीलकर्त्याविरुध्दच्या विभागीय चौकशीमध्ये विशेष चौकशी अधिकारी यांच्यासमोर श्री.गिरमे, विक्रीकर उपआयुक्त व श्री.देशपांडे, सह विक्रीकर आयुक्त यांनी स्वत:च्या हस्ताक्षरात नोंदविलेल्या संपूर्ण जाब-जबाबाच्या प्रमाणित प्रती, तसेच विशेष चौकशी अधिकारी श्री.नांदेडकर यांनी स्वत:च्या हस्ताक्षरात साक्षीदारांच्या नोंदविलेल्या जाब-जबाबाच्या नकला. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संभाजी भाऊसाहेब बुधावले यांनी दोन्ही अपिलांत मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रिकर आयुक्त व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर विक्रीकर आयुक्त यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ अन्वये नाकारली. सदर निर्णयाच्या विरोधात अपीलकर्त्यांने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

सदर अपिलांचा दि. २२/१/२००८ रोजीच्या विशेष अपील कार्यक्रमांमध्ये समावेश होता. सदर कार्यक्रमास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. मात्र अपीलकर्ता गैरहजर होते. संबंधितानी आयोगाकडे सादर केलेले अहवाल व अपिलांतील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. अपील अमान्य.

२ अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार संबंधित जाब-जबाबाच्या नकला माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्वरित उपलब्ध करुन द्याव्या.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.इब्राहिम मालिक चौधरी
रा.१०० रोड भारत नगर, मिरज,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०८/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली श्री.वाय.बी.माळी तर्फे प्रतिनिधी श्री.आर.पी.जाधव

**जन माहिती अधिकारी तथा** सहा.आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका,
जि.सांगली श्री.आर.पी.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.५.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.९.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने मिरज येथे फुटबॉल स्पर्धा आयोजित केल्याचे फलक लागल्याच्या अनुषंगाने आपण मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.आर.पी.जाधव यांनी दिली नाही. अर्जातील देय माहिती प्रभाग अधिकारी क्रमांक ४ व मुख्य लेखापाल यांच्याकडून घेऊन चार दिवसांत अपीलकर्त्यास निःशुल्क पुरविण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,सांगली, मिरज,कुपवाड शहर महानगरपालिका,जि.सांगली यांनी दिला. तसेच उपलब्ध माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांना दंड होऊ शकतो, याची त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील, असे निकालपत्रात स्पष्ट नमूद केले. तरीही माहिती दिली गेली नाही. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना शास्ती करावी, माहिती मिळावी व आपल्याला नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.इब्राहिम मालिक चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडील माहिती अर्जात, 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व लेखी निवेदनाद्वारे केली.

श्री.चौधरी यांनी मागितलेली माहिती तीन विभागांकडील होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.शिवाजी रसाळे यांनी मालमत्ता व्यवस्थापक, मुख्य लेखापाल व प्रभाग अधिकारी क्रमांक-४ यांना माहितीबाबत लेखी कळविले. त्यांनी दि.११.०६.२००७ पर्यंत माहिती दिली. परंतु ती विसंगत असल्यामुळे अपीलकर्त्यास दिली नाही. प्रभाग अधिकारी क्रमांक-४ श्री.ए.डी.पाटणकर यांच्या संदर्भात सर्व मुद्दे असल्याने त्यांना लेखी व तोंडी सूचना देऊनही माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.शिवाजी रसाळे व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.बाजीराव जाधव यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे.

श्री.पाटणकर यांनी बेकायदेशीर फुटबॉल स्पर्धेसाठी रु.६,००,०००/- तसलमात घेतली होती. त्याचा जमाखर्च देणे हेतुपुरस्सर टाळले जात आहे, असे श्री.चौधरी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

माहिती देणे श्री.पाटणकर यांनी हेतुपुरस्सर टाळल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.शिवाजी रसाळे व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.बाजीराव जाधव यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

प्रथम अपिलातील निर्णयानुसार सबंधित विभागाकडून पुर्तता झाली नाही. मात्र अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती देण्याचे दि.२२.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात' ठरले. त्यानुसार दि.४.११.२००८ रोजी माहिती देण्यात आली, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री. आर.पी.जाधव यांनी लेखी व तोंडी प्रतिपादन केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदत्रे व निवेदन पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.शिवाजी रसाळे यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली. प्रभाग क्रमांक-४ चे अधिकारी श्री.ए.डी.पाटणकर यांनी आधी विसंगत माहिती दिली व नंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही नेमकी माहिती दिली नाही. माहिती देण्यास ते जबाबदार असून जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.शिवाजी रसाळे व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.बाजीराव जाधव यांनी तसे स्पष्ट केले असूनही माहितीची त्यानुसार पूर्तता न करण्याची त्यांची कृती म्हणजे माहिती नाकारणे आहे. माहितीबाबत त्यांना लेखी व तोंडी कळविलेले असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ५ (४ व ५) मधील तरतुदीनुसार श्री.पाटणकर हे जन माहिती अधिकारी ठरतात. व माहिती न देण्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.

२. प्रभाग अधिकारी श्री.ए.डी.पाटणकर यांनी आधी विसंगत माहिती दिली व नंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही नेमकी माहिती दिली नाही. माहितीची त्यानुसार पूर्तता न करण्याची

त्यांची कृती म्हणजे अपीलकर्त्यांस माहिती नाकारणे आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ५(४ व ५) मधील तरतुदीनुसार श्री.पाटणकर जन माहिती अधिकारी ठरतात व माहिती न देण्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात. त्यानुसार श्री.पाटणकर यांना रु.२५,०००/- शास्ती करण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम एप्रिल, मे व जून २०१० मध्ये देय असणाऱ्या मे, जून व जुलै २०१०च्या वेतनातून तीन समान हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६० इतर सेवा,८००, इतर जमा रकमा,(१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशीर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांनी करुन याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 21 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महेश भिमराव जाधव
१६,सहयोगनगर जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर
ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१९ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २७.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर जि. सोलापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१२.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.४.२०१० |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

संपूर्ण माहिती मिळाली असून अपील निकाली काढावे, असे अपीलकर्ता श्री. महेश भिमराव जाधव यांचे २३.४.२०१० चे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दिपक अजिनाथ माने
ब्लॉक नं.३२, श्रीकृष्ण पार्क, आर.टी.ओ.
ऑफिसजवळ, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
यशोधरा प्रशाला, २ नं.झोपडपट्टी, संजय गांधीनगर,
विजापूर नाका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४२ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. दिपक अजिनाथ माने<br>ब्लॉक नं.३२, श्रीकृष्ण पार्क, आर.टी.ओ.<br>ऑफिसजवळ, विजापूर रोड, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,<br>यशोधरा प्रशाला, २ नं.झोपडपट्टी, संजय गांधीनगर,<br>विजापूर नाका, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.४.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१.२०१० |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल आदी माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, २ नं. झोपडपट्टी, संजय गांधी नगर, विजापूर नाका, सोलापूर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या आदेशानंतरही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिपक अजिनाथ माने यांनी केली.

अपीलकर्त्याच्या मागणीनुसार विहित मुदतीत उत्तर दिले. अपीलकर्ता अतिरिक्त शिक्षक ठरल्यामुळे शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या आदेशाने त्यांना अन्य शाळेत रूजू करण्यात आल्यामुळे माहितीच्या अधिकाराचा गैरफायदा घेऊन त्रास देण्यासाठी वेळोवेळी अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. अन्य कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वरूपाची माहिती वारंवार मागत असतात. देय माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे व शालेय कामकाजाची अडचण निर्माण करु नये, असे त्यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर यांनी गोपनीय अहवालाच्या प्रती वगळता अन्य माहिती श्री. माने यांना वेळोवेळी दिली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एन. एम. वीर यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यास स्वत:च्या संदर्भातील गोपनीय अहवालाची प्रत देण्यात आली असल्याचे व सन २००३ पूर्वी गोपनीय अहवाल लिहिले जात नव्हते, असेही स्पष्ट करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एन. एम. वीर यांच्या

निवेदनावरून दिसते. अन्य कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असून त्यांच्या संमतीविना देता येणार नाही. तसेच अपीलकर्त्याने सरसकट स्वरूपात माहिती मागणे योग्य नाही. गोपनीय अहवाल लिहिण्याबाबतची वस्तुस्थिती पत्राद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर यांनी अपीलकर्त्यास कळवावी, व अपीलकर्त्याने मागितलेल्या १२ वर्षांतील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या आदेशाच्या प्रती आहेत. योग्य ते शुल्क आकारुन अपीलकर्त्यास द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर यांनी दि. १७.४.२०१० च्या पत्रान्वये माहितीच्या छायांकित प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीकांत महादेव चौगुले ..... **अपीलकर्ता**
मु.पो.खोची, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक, सहकारी संस्था, ..... **उत्तरवादी**
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** चेअरमन/सचिव,
महावीर विकास सेवा संस्था मर्या. इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४३/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक १०.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.श्रीकांत महादेव चौगुले<br>मु.पो.खोची, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.बी.एस.पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** चेअरमन/सचिव, महावीर विकास सेवा संस्था मर्या.<br>इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.एन.बुगटे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २८.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ११.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय नाही. |
| ८ | मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती संबंधित संस्थेकडून घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी कळविले व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही. माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.श्रीकांत महादेव चौगुले यांनी केली.

माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सचिव, महावीर विकास सेवा संस्था मर्यादित, इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडे अर्ज वर्ग केला. श्री.चौगुले हे सर्टिफाइड ऑडिटर असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी सन २००७-२००८ ची आमच्या संस्थेची लेखा तपासणी करण्याचे काम त्यांना दिले होते. संबंधित लेखा तपासणी करून घेण्यास विविध कारणांमुळे विलंब झाला. माहितीसाठी संस्थेकडे त्यांनी अर्ज केलेला नाही. आयोगाच्या सूचनेवरून उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी त्यांच्या अर्जाबाबत संस्थेला कळविले. शुल्क भरल्यास त्यांना माहिती दिली जाईल, असे प्रतिपादन संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा सचिव, महावीर विकास सेवा संस्था मर्यादित, इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.एन.बुगटे यांनी केले.

प्रथम अपिलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर नव्हते. संस्थेला शासनातर्फे कर्जमाफी व व्याजमाफी मिळत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.बी.एस.पाटील यांनी केले. संस्थेने देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क भरून घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१९.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विश्वनाथ श्रीहरी कुलकर्णी
६ ए ओंकार को.ऑप.हौ. सोसायटी,
महिला होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजच्या मागे,
होडगी रोड, मजरेवाडी, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
यशोधरा प्रशाला, २ नं.झोपडपट्टी, संजय गांधीनगर,
विजापूर नाका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४३ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विश्वनाथ श्रीहरी कुलकर्णी
६ ए ओंकार को.ऑप.हौ. सोसायटी,
महिला होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजच्या मागे,
होडगी रोड, मजरेवाडी, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एन. वीर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
यशोधरा प्रशाला, २ नं.झोपडपट्टी, संजय गांधीनगर,
विजापूर नाका, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.३.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१.२०१० |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९९७ ते २००७-०८ या काळातील सर्व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशांच्या सत्य प्रती, गोपनीय अहवालाच्या प्रती आदी माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिलेल्या आदेशानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्ण माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विश्वनाथ श्रीहरी कुलकर्णी यांनी केली.

सन १९९७ पासूनच्या गोपनीय अहवालाच्या प्रती श्री. कुलकर्णी यांनी मागितल्या होत्या. परंतु सन २००३-०४ पासून गोपनीय अहवाल लिहिण्यास सुरुवात झाली, तेव्हापासूनच्या प्रती त्यांना दिल्या आहेत. श्री. कुलकर्णी आमच्या प्रशालेत अतिरिक्त झालेले शिक्षक असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी अन्य प्रशालेत त्यांचा समावेश केला, त्यामुळे सूडबुध्दीने प्रशालेला त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीच्या अधिकाराचा गैरफायदा घेऊन ते विविध स्वरूपाचे अर्ज, तक्रारी व माहितीची मागणी याद्वारे संस्थेला बदनाम करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर यांनी केले.

सन २००१ ते २००२-०३ पर्यंतची माहिती रजिस्टर्ड टपालाने अपीलकर्त्यास नि:शुल्क पाठवावी, असे आदेश आपण दिले. सन १९९९ ते २००२-०३ पर्यंतची माहिती दि. १.३.२०१० पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी मान्य केले. त्यानुसार पाठविलेल्या उत्तराची / माहितीची प्रत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर यांनी आपल्या कार्यालयास सादर केली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता एकाच जन माहिती अधिकाऱ्याकडे अपीलकर्ता सातत्याने एकाच विषयाबाबत माहिती मागणीचे अर्ज व पत्रव्यवहार करीत असल्याचे दिसून येते. अन्य शिक्षकांच्या / कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालासारखी व्यक्तिगत स्वरूपाची माहिती त्रयस्थ पक्षाची असून अपीलकर्त्यास ती त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय देणे योग्य नाही.

आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार नियुक्ती आदेशांच्या प्रती आदि माहिती दि. २९.४.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने श्री. कुलकर्णी यांना पाठविल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, यशोधरा प्रशाला, सोलापूर सौ. व्ही. आर. सुतकर यांनी माहितीच्या प्रतींसह आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 30 APR 2010